10

**परिविक्षा कालावधी समाप्त करणेबाबत...**
डॉ. ललितकुमार काशीरामजी पटले,
जिल्हा क्षयरोग अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र, चंद्रपूर.

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

आदेश.क्र.आसेआ/कक्ष-१/टे-५/परिवि आदेश-२०२६/डॉ.पटले/ ९१६३-७२ /२६

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई -०१

दिनांक - २० एप्रिल, २०२६.

**वाचा -**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/आठ, दि.२९/०२/२०१६.
२) शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क. परिवि-२०१८/प्र.क.२/आठ, दि०७/०२/२०१८.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. परिवी-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि. २५/०८/२०१५.
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. नामनि-१४२२/प्र.क्र.४०५/सेवा-२,दि.२८/०४/२०२३.
५) उपसंचालक,आरोग्य सेवा,नागपूर मंडळ, नागपूर यांचा पत्र जा.क्र.ब-३/मवैआसे/वर्ग-१/१८६३५-३६ /२०२५, दि. १४/०७/२०२५.
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. संकिर्ण २०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि. ०९/०२/२०२६.

## आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार डॉ. ललितकुमार काशीरामजी पटले, यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील "जिल्हा क्षयरोग अधिकारी" गट-अ या पदावर दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता संदर्भीय दि. २८/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत नियुक्ती करण्यात आली आहे.

उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी संदर्भीय दि.१४/०७/२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील " जिल्हा क्षयरोग अधिकारी " वर्ग-१, जिल्हा क्षयरोग केंद्र, चंद्रपूर या पदावर पदस्थापना दिलेल्या डॉ. ललितकुमार पटले यांनी त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असल्याने, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची बाब आयुक्तालयाच्या विचारधीन होती.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ, गधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील डॉ. ललितकुमार काशीरामजी पटले, जिल्हा क्षयरोग अधिकारी, गट-अ यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने संदर्भीय शासन निर्णय अन्वये विहीत केलेल्या आवश्यक बाबी समाधानकारकरित्या पूर्ण केलेल्या असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी खालील तकत्यात दर्शविलेल्या स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास (म.न.) समाप्त करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | नाव | कार्यालय | "जिल्हा क्षयरोग अधिकारी" पदावरील रुजु दिनांक | परिविक्षाधिन कालावधी समाप्त केलेल्याचा दिनांक | परिविक्षा धिन कालावधी पुढे ढकलण्या ची कारणे | " जिल्हा क्षयरोग अधिकारी " पदावरील सेवा नियमितपणे पुढे चालु ठेवण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | डॉ. ललितकुमार काशीरामजी पटले | जिल्हा क्षयरोग अधिकारी वर्ग-१, जिल्हा क्षयरोग केंद्र, चंद्रपूर . | दि.०४/०५/२०२३ (म.पू.) | दि.०३/०५/२०२५ ( म.नं. ) | निरंक | दि.०४/०५/२०२५ |

उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांना कळविण्यात येते की, डॉ. ललितकुमार काशीरामजी पटले, जिल्हा क्षयरोग अधिकारी, वर्ग-१, जिल्हा क्षयरोग केंद, चंद्रपूर गट-अ यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतुदीनुसार मुक्त करण्याच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करावी.

सामान्य प्रशासन विभाग दि. २२.०६.२०२१ मधील विहीत अटी व शर्तीची पूर्तता करणा-या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) तसेच सामान्य राज्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) मधील अधिका-यांचे परिविक्षा कालावधी समाप्तीचे आदेश निर्गमीत करण्याचे अधिकार शासनपत्र क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि.०९/०२/२०२६ अन्वये आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना प्रत्यावर्तीत करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

हे आदेश आयुक्तालयाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आले आहेत.

**( मा.आयुक्त यांच्या मान्यतेने )**

**( राजेंद्र भालेराव )**
**सहसंचालक, ( प्रशासन )**
**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**

प्रत - उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर .
प्रत - जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र चंद्रपूर.
प्रत -मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ) -२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
प्रत -मा. महालेखापाल, लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र , मुंबई/ नागपूर
प्रत -जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर .
प्रत -डॉ.ललितकुमार काशीरामजी पटले, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, चंद्रपूर.
प्रत- आयटी सेल, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई- आपणांस कळविण्यात येते की उपरोक्त आदेश https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिघ्द करण्यात यावे.
प्रत - निवडनस्ती ( कार्यासन-१ )

Scanned with OKEN Scanner